DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**फौजदारी चौकशी अर्ज क्र.३०७/२०२०**
**निशाणी क्र.२५ खालील आदेश**

**पुष्पलता मल्लीकार्जुना मुद्दीसेट्टी आणि इतर १**
**विरुध्द**
**मल्लीकार्जुना रामासुबय्या मुद्दीसेट्टी**

सामनेवाला यांनी सदरचा अर्ज, अर्जदार क्र.१ या मे. कोर्टाच्या स्थळसीमेबाहेर राहत असल्याचे कथन करुन सदरचा अर्ज या न्यायालयास चालविण्याचा अधिकार नाही, त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा याकरिता दिलेला आहे.

०२. सदरचा अर्ज वाचला. त्यावरील अर्जदार यांचे म्हणणे वाचले. अर्जदारातर्फे वकील श्री. भारत दवंडे व सामनेवालातर्फे वकील श्री. आदित्य भाटे यांचा युक्तीवाद ऐकला.

०३. अर्जदारातर्फे वकीलांनी असे कथन केले की, अंतरिम अर्जाविरुध्द सामनेवाला यांनी माणगाव येथील सत्र न्यायालयात फौजदारी अपील क्र.१८/२०२२ दाखल केले होते. सदर अपीलाच्या नोटीसीची बजावणी अर्जदार या पत्त्यावर राहत नाही अशा शेऱ्याने परत आली होती. त्यामुळे अर्जदार यांनी त्या या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात राहत नाहीत असे कथन करुन सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

०४. अर्जदारातर्फे वकीलांनी फौजदारी अपील क्र.१८/२०२२ मधील न्यायनिर्णयाची छायांकित प्रत या कामी हजर केली आहे. सदर छायांकित प्रतीचे अवलोकन करता असे दिसुन येते की, अर्जदार या त्या अपीलामध्ये हजर झालेल्या आहेत व सदरचे अपील मे. सत्र न्यायालयाने गुणदोषावर चालवुन नामंजूर केले आहे. कौटूंबिक हिंसाचार कायदा हा कायदा महिलांकरिता फायदेशीर कायदा (Beneficial Legislation) आहे.

सदर कायद्यामधील कलम २७ चे अवलोकन करता असे दिसुन येते की, पिडीत व्यक्ती कायमस्वरुपी किंवा तात्पुरत्या स्वरुपात राहत असेल किंवा काम करीत असेल, त्या ठिकाणी ती या कायद्याच्या तरतुदीप्रमाणे अर्ज दाखल करु शकते.

०५. अर्जदाराच्या कथनानुसार ती या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रामध्ये राहते व त्याप्रमाणे कौटूंबिक घटना अहवाल देखील या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात असलेल्या भागामधील दाखल केलेला आहे. त्यामुळे केवळ अपीलामधील नोटीस अर्जदार त्या ठिकाणी राहत नाही अशा शेऱ्याने परत आली म्हणुन अर्जदार या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रामध्ये राहत नाहीत असा निष्कर्ष काढणे न्यायोचित नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

SHAIKH BABASO S PATIL
Digitally signed by SHAIKH BABASO S PATIL
Date: 2023.11.06 15:50:50 +0530

महाड
दिनांक – ०४/११/२०२३

(**एस. एस. पाटील**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड